# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**प्रेस नोट**

**दिनांक १८/०८/२०२२ (गुरूवार)**

**(सायंकाळ)**

---

## नागपूर ग्रामीण पोलीस दला तर्फे ७५ गरजु व आर्थिक दुर्बळ विद्यार्थीनींना सायकल वाटप

नागपूर जिल्हा ग्रामीण अंतर्गत स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव निमित्त पोलीस मुख्यालय नागपूर ग्रामीण येथील पोलीस अधीक्षक कार्यालय येथेमा. देवेन्द्रजी फडणवीस उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांनी पोलीस भवन येथील ६ व्या माळयावर असलेले सायबर पोलीस स्टेशन चे उदघाटन केले. तसेच नागपूर जिल्हा ग्रामीण अंतर्गत असलेल्या एकुण २१ पोलीस स्टेशन मधील ७५ आर्थिक दुर्बळ व गरजु विद्यर्थीनींना ७५ सायकल वाटप करण्यात आले. त्यापैकी दिनांक १३/०८/२०२२ रोजी प्रातिनिधीक स्वरूपात पोलीस स्टेशन बुटटीबोरी येथील ५ विद्यार्थीनींना मा. देवेन्द्रजी फडणवीस उपमुख्य मंत्री महाराष्ट्र राज्य यांचे हस्ते तर दिनांक १७/०८/२०२२ रोजी नागपूर ग्रामीण पोलीस दला तर्फे पोलीस मुख्यालय नागपूर ग्रामीण येथे आयोजीत सायकल वाटप कार्यक्रमात सोलार ग्रुप ऑफ इंडस्ट्रीचे अध्यक्ष मा. श्री. सत्यनारायण नुवाल यांच्या हस्ते उर्वरीत पोलीस स्टेशन खापरखेडा येथील ५ विद्यार्थीनींना, पोलीस स्टेशन रामटेक येथील ५ विद्यार्थीनींना, पोलीस स्टेशन उमरेड येथील ३ विद्यार्थीनींना, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथील ४ विद्यार्थीनींना, पोलीस स्टेशन खापा येथील ४ विद्यार्थीनींना, पोलीस स्टेशन देवलापार येथील ३ विद्यार्थीनींना, पोलीस स्टेशन काटोल येथील ४ विद्यार्थीनींना,पोलीस स्टेशन कन्हान येथील २ विद्यार्थीनींना, पोलीस स्टेशन बेला येथील ३ विद्यार्थीनींना, पोलीस स्टेशन मौदा येथील ३ विद्यार्थीनींना, पोलीस स्टेशन पारशिवनी येथील ३ विद्यार्थीनींना, पोलीस स्टेशन भिवापुर येथील ४ विद्यार्थीनींना, पोलीस स्टेशन सावनेर येथील ४ विद्यार्थीनींना, पोलीस स्टेशन कुही येथील २ विद्यार्थीनींना, पोलीस स्टेशन केळवद येथील ४ विद्यार्थीनींना, पोलीस स्टेशन नरखेड येथील ४ विद्यार्थीनींना, पोलीस स्टेशन कोंढाळी येथील ३ विद्यार्थीनींना,पोलीस स्टेशन जलालखेडा येथील ४ विद्यार्थीनींना,पोलीस स्टेशन कळमेश्वर येथील ४ विद्यार्थीनींना, पोलीस स्टेशन वेलतुर येथील ३ विद्यार्थीनीं अश्या ७० विद्यार्थीनींना सायकल वाटप करण्यात आले आहे. त्यामुळे शाळेतील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीनींमध्ये उत्साह निर्माण झालेला आहे.

या प्रसंगी नागपुर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक मा. श्री. विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणीकर, पोलीस उपअधीक्षक श्री संजय पुरंदरे तसेच सर्व शाखेमधील अधिकारी व कर्मचारी तसेच विद्यार्थीनीं पालकांसह उपस्थीत होते.










पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर